**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१४/२०१३**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२**

**निशाणी क्र.९५**

**शपथेवर कथन करते की,**

नांव – सौ. शैला प्रमोद सोनावणे

वय – ४२ वर्षे, धंदा – ग्रामसेवक,

राहणार – मुळ सजा, ग्रामपंचायत म्हसवे, ता. जावली, जि.सातारा

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम.यु.शिंदे यांचेमार्फत सुरु</u>**

१. मला साक्षीचे समन्स आलेले आहे. त्याप्रमाणे मी कागदपत्रे घेवून आलेले आहे. मी दि.१७.०८.२०२३ पासून आखाडे ग्रामपंचायत, ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहे. आज मी जे कागदपत्रे घेवून आले त्याचा ताबा हा सरपंच यांच्याकडे असतो. सदरचे रेकॉर्ड हे ठेवण्यासाठी सरपंच यांच्याकडे असते. परंतू त्याची सर्व जबाबदारी सचिव या नात्याने ग्रामसेवक यांच्याकडे असते. ग्रामसभेच्या मासिक ठरावाच्या अनुषंगाने ग्रामसेवक नोंदी घेतात. मी रजिस्टर आणले आहे ते १९५८ सालचे आणले आहे. सदर रजिस्टरमध्ये ग्रा.पं.मि.क्र.६८, ६९, ७० ही आहे. पूर्वीचे नंबर ६८, ६९, ७० चे ६९, ७०, ७१ झालेले आहेत. (*आता सदर साक्षीदार यांच्याकडील ग्रा.पं.मि.क्र.६९, ७० यांच्या नोंदीचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, सदर नोंदीमध्ये मालक या रकान्यात वामन रघुनाथ हे अक्षर शाई पेनने नमूद केलेले असून पुढे आडनाव शिंदे हे बॉलपेनने नमूद केलेले आहे. तसेच, रामचंद्र देवराव हे नाव बॉलपेनने नमूद केलेले आहे व त्यापुढे शिंदे हे शाई पेनने नमूद केल्याचे दिसून येत आहे. निकालाच्यावेळी सदरच्या मुळ रजिस्टरची आवश्यकता भासल्यास ग्रामसेवक अथवा सरपंच, आखाडे यांना सदर मुळ रजिस्टर सादर करणेसाठी आदेश करणे उचित होईल.*)

२. ग्रा.पं.मि.क्र.६८, ६९, ७० यांचा पुढे १०२, १०३/अ, १०३/ब असा झाला. त्याबाबतचे मी १९६३ ते १९६६ चे मिळकत नोंदीचे रजिस्टर आणलेले आहे. मी १९७६ पासून १९७८ पर्यंतचे ग्रामपंचायत मिळकत नोंदींचे रजिस्टर आणलेले आहे. याच मिळकतींचा पुढे मिळकत क्र.१२५ झाला. त्याची मी खात्री केलेली आहे. त्यावर चतू:सिमेचा

नकाशा नमूद आहे. त्यानंतर मी आजरोजी सरपंच यादी आणलेली आहे. सदरची यादीची नोंद ही सरपंच निवडणूकीच्यावेळी मासिक सभेच्या प्रोसिडींगमध्ये होती. त्याच्यावरुन मी ती तयार केलेली आहे. सदरची यादी ही माणिक ग्रामसेवकांनी केलेली आहे. त्याबाबत मी खात्री केलेली आहे. रामचंद्र देवराम शिंदे हे ३१.०५.१९६७ पासून २८.०६.१९७२ पर्यंत सरपंच होते. वर नमूद रजिस्टर हे साक्षीकामी ग्रामसेवक यांनाच घेवून जावे लागतात. सदरचे रजिस्टर हे ग्रामपंचायतीमध्ये ठेवलेले असतात, ते आम्ही घेवून येतो. निशाणी क्र.९४ सोबत प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांना निशाणी देण्यास अॅड.श्री.डी.टी.पवार यांनी हरकत घेतली की, साक्षीदार हे सदर दस्ताचे ऑथर नाहीत. त्यामुळे, निशाणी देण्यात येवू नये. परंतू, सदर कागदपत्र हे सार्वजनिक दस्तऐवज असल्यामुळे त्यांना निशाणी देण्यात येत आहे. अॅड.श्री.डी.टी.पवार यांच्या हरकतीचा विचार युक्तिवादावेळी करण्यात येईल.

**सरतपास पूर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेतर्फे विधीज्ञ श्री.डी.टी.पवार यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी निशाणी क्र.१०० ची मुळ प्रत आणलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर निशाणी क्र.१०० वर मी सत्यप्रत म्हणून सही व शिक्का केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या यादीवरुन मी ते ते सरपंच त्या कालावधीमध्ये कार्यरत होते हे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.१०० मध्ये रामचंद्र देवराव शिंदे हे १९६७ ते १९७२ सरपंच होते असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, काही सरपंचांचा ५ वर्षांचा कालावधी काही वेळा पूर्ण होत नाही.

प्रश्न – रामचंद्र देवराव शिंदे हे ५ वर्षे सरपंच होते हे तुम्ही कशाच्याआधारे सांगितले ?

उत्तर – मासिक प्रोसिडींगची खात्री केल्याच्या आधारे.

ग्रामपंचायत मिळकतींच्या नोंदींचे रजिस्टर हे कामयस्वरुपी जतन करतो. तसा मी शासनाचा जीआर दाखल करण्यास तयार आहे.

प्रश्न – सदरचे रजिस्टर घेवून येण्यासाठी तुम्ही सरपंच यांना लेखी मागणी केली होती का ?

उत्तर – न्यायालयातून साक्षीसमन्स आल्यानंतर ते सरपंच यांच्यासमोर सादर केले व त्यांनीच मला सदर कागदपत्रे घेवून साक्षीस जाण्यास सांगितलेले आहे.

प्रश्न – सदर तीन रजिस्टर घेवून येताना तुम्ही सदर तीन रजिस्टर ताब्यात घेतल्याची पोहोच सरपंच यांना दिली का ?

उत्तर – तशी आवश्यकता भासली नाही.

आमच्याकडे आवक जावक रजिस्टर नाही.

प्रश्न – तुम्ही साक्षीला येतात याची नोंद कुठं ठेवली आहे का ?

उत्तर – आज मेढा येथे मिटींग असल्यामुळे मी गट विकास अधिकारी यांच्या परवानगीने रजिस्टर घेवून आलेले आहे.

मी मिटींगसाठी आलेले आहे व मिटींगमधून साक्षीसाठी परवानगी घेवून आलेले आहे. मी साहेबांची तोंडी परवानगी घेतलेली आहे.

प्रश्न – ग्रा.मि.क्र.६९, ७० याच्या नोंदी या शाईपेनने केलेल्या आहेत ?

उत्तर – ते मी सांगू शकत नाही. त्याकरीता तुम्हाला बघण्यासाठी रजिस्टर आणलेले आहे.

हे म्हणणे खरे आहे की, मी १९५८–५९ चे रजिस्टर आणले आहे, त्यामध्ये ग्रा.पं.मि.क्र.६८, ६९ ला मालक सदरी कोणाचीही नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रा.पं.मि.क्र.१२५ ला मुळ मालकांची नांवे बदलून ज्यांची नावे नमूद झालेली आहेत त्याबाबत ग्रामपंचायतचा ठराव नमूना नं.८ ला दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत मिळकतीला काही बदल करावयाचा झाल्यास अथवा मालकीमध्ये बदल होत असल्यास तो ग्रामपंचायतीचा ठरावाशिवाय होत नाही. १९५८–५९ साली ग्रा.पं.मि.क्र.६८, ६९, ७० यामध्येदेखील ग्रामपंचायतीचा ठराव नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, १९५८ ते १९६२ या सालीदेखील ग्रामपंचायत मिळकत क्र.६८, ६९, ७० ला ग्रामपंचायत ठराव नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत मिळकतींना जी नांवे असतात ती मालकी हक्काची नसतात.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा

**दिनांक** : ०८.०९.२०२३

रविंद्र भ. खवले,

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**